स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या

मानव्यविद्याशाखेतील मराठील विषयातील

पीएच्.डी. पदवीच्या नोंदणीसाठी सादर

संशोधन आराखडा

‘मराठी दलित कवितेतील बदलत्या दलित जाणिवांचा चिकित्सक अभ्यास’ (इ.स.२००० नंतरची कविता)

संशोधक

फारुकी मुशीर अहेमद आबेद अहेमद

(एम.ए., एम.एड., नेट (मराठी))

मार्गदर्शक

प्रा.डॉ.भास्कर श्रावण गायकवाड

(एम.ए., बी.एड्., सेट, पीएच्.डी.)

मराठी विभाग प्रमुख

महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा

जुलै-२०२२

‘मराठी दलित कवितेतील बदलत्या दलित जाणिवांचा चिकित्सक अभ्यास’

(इ.स.२००० नंतरची कविता)

१. प्रस्तावना :

स्वातंत्र्योत्तर काळात उदयास आलेल्या दलित साहित्यातील ‘दलित कविता’ हा समृध्द व सकस असा लक्षवेधक वाङ्मयप्रकार आहे. ह्या कवितेने नव्या प्रवृत्ती, त्यातील स्थित्यंतरे आणि वृत्त्यंतरे याचे सम्यक व वास्तव दर्शन घडविले. केशवसुतानंतर विद्रोहाचा इतका प्रभावी आविष्कार करुन मराठी कवितेच्या इतिहासात नवे पर्व उलगडणारी दलित कविता जाणिवा घेऊन, आपले नवे स्वतंत्र रुप धारण करू लागली.

दलित कवितेचा उदय ही ऐतिहासिक घटना होती. ज्यांच्याजवळ भाषा होती, त्यांनी अगदी सहजपणे मुक्तछंदातून ही अभिव्यक्ती केली.

कविता हा उत्कट भावाविष्कार आहे, तिने परिवर्तनाशी नाते जुळविलेच पाहिजे. काही काळ त्या त्या वेळच्या परिवर्तनाशी, उपलब्ध कवितेचे थोडेफार जुळले. आध्यात्मिक क्षेत्रात भक्तीच्या अंगाने, अभंगाच्या अंगाने, ती लोकजीवनासोबत हेलकावत होती. भारुड, लावण्या, पोवाड्यातून झुळझुळत होती. पण हळूहळू तिचा हा स्वभाव साकळला आणि ती मर्यादित व व्यक्तिकेंद्री वृत्तीलाच शरण गेली व्यापकपणाशी व परिवर्तनाशी प्रतिबध्द राहण्याचा दलित कवितेचा नुसता स्वभावच नाही, तर तिचे ते महत्त्वाचे अंग आहे.

मनाला साधेपणाने व सिधेपणाने भिडण्याची उपलब्ध मराठी काव्यात गढुळलेली तऱ्हा, दलित कवितेने पुन्हा आणली. कलात्मक स्वातंत्र्य व आविष्करण वैचित्र्य यांच्या कल्पना आत्यंतिकपणे राबवणाऱ्या कवितेपेक्षा, म्हणून ती सर्वस्वी भिन्न आहे. विद्रोही कवितेच्या प्रस्तावनेत प्रा.केशव मेश्राम लिहितात, ‘धर्मपीडितांच्या, समाजातून गावकुसाबाहेर फेकल्या गेलेल्या दलितांच्या, अन्न, वस्त्र, निवारा यासाठी लाचार झालेल्या श्रमिकांच्या,

शरीरविक्रयाची नामुष्की आलेल्या भगिनींच्या, तसेच हॉटेलात, दारुभट्ट्यांत, सट्टाबेटिंगच्या कवटाळात, तस्करीच्या काळधंद्यात, मटक्याच्या झटापटीत, भवडेगिरीच्या भोगात, याचकाच्या मूढ सोंगात, शेतमजुरांच्या मोटाळीत, बॉयलरच्या गरम राखेत, गूघाणीच्या बुदबुदत्या नरककुंडात, बड्या संस्थांच्या खेळखंडोब्यात, नुसते ‘जगत असण्याच्या’ विडंबनात फसलेल्या असंख्यांचे, अगणित अनुभव विद्रोही कविता प्रकट करते. हे प्रकटन व्यापक व समुच्चयात्मक पध्दतीचेच आहे. व्यक्ती म्हणून प्रत्येक कवीला येणारे त्याच्या मनोविश्वाला गदगदा हलवणारे, त्यांच्या आंतरजीवनाची, कुटूंबजीवनाची, शेजार धर्माची, सहप्रवासाची, प्रेमभावनेची, अवाक बनविणाऱ्या निर्णयक्षणांची, स्वजनांची केलेल्या विश्वासघाताची, खच्ची झालेल्या भावनांची, मारल्या गेलेल्या जिवलगांची, बेकार असलेल्या भावांची, आणि कितीतरी सूक्ष्मातिसूक्ष्म पातळीवरील यशापयशाची, दगादिलाशांची कंपने ह्या, बहुरुपी कवितेचा आवाका किती जबरदस्त आहे, याचीच साक्ष देते.

१९६० नंतर उदयास आलेल्या दलित साहित्यातील ‘दलित कविता’ फार मोठ्या संख्येने लिहिली जात आहे. गेल्या साठ वर्षाच्या काळातील तिची झेप व आवाका स्तिमित करणारा आहे. आरंभीच्या काळात नामदेव ढसाळ, बाबुराव बागूल, दया पवार, प्रल्हाद चेंदवणकर, ज.वि.पवार, केशव मेश्राम, त्र्यंबक सपकाळे, राजा ढाले, यशवंत मनोहर, वामन निंबाळकर, अर्जुन डांगळे इ. कवींनी दलित कवितेची मशागत केली. त्यानंतर दलित कवितेत अनेक स्थित्यंतरे घडत गेली. १९९१ च्या जागतिकीकरणानंतर विलक्षण आमूलाग्र बदल दलित कवितेत घडून आलेत. इ.स.२००० नंतर दलित कवितेत नव्या जाणिवा अभिव्यक्त होऊ लागल्या. इ.स.२००० पूर्वीची जुनी दलित कविता व इ.स. २००० नंतरची नवी दलित कविता यात व्यक्त झालेल्या दलित जाणिवांत विलक्षण मूल्यात्मक फरक जाणवू लागलाय. यादृष्टीने मी दलित कवितांचे वाचन केल्याने हा विषय आकार घेऊ लागलाय.

दलित कवितेच्या मूळाशी ‘दलित जाणीव’ आहे. ‘दलित जाणीव’ ही दलित कवितेचे प्राणतत्व आहे. ह्या जाणिवांमुळे दलित साहित्य वेगळे ठरते. याविषयी ‘निळी पहाट’ मध्ये रा.ग.जाधव म्हणतात, ‘दलित साहित्यात सामाजिक जाणिवा व सौंदर्यदृष्टी या दोहोंचाही प्रत्यय येतो. दलित साहित्य हे एक साहित्यप्रवाह म्हणून प्राधान्याने सामाजिक जाणिवांचे साहित्य आहे हे खरेच.

सामाजिक जाणिवांच्या प्राधान्याने समग्र दलित साहित्याला एक प्रवाह म्हणून वेगळेपण येते हे जसे महत्त्वाचे; तसेच त्या जाणिवांच्या विशिष्ट आविर्भावातून त्याला साहित्यकृती गणिक एक प्रकारचे अनन्यसाधारणत्व लाभते हेही महत्त्वाचे आहे. या दुहेरी वस्तुस्थितीतच दलित साहित्याच्या परंपरेचे व दलित साहित्यकृतीला एक यथादर्शन देत असते. सुदैवाने ही परंपरा समग्र मराठी साहित्याचीच असल्याने दलित साहित्यकृतीला आपोआपच व्यापक मराठी परंपरेची पार्श्वभूमी प्राप्त होते. या दृष्टीने पाहता, दलित साहित्याच्या वेगळ्या प्रवाहातील सामाजिक जाणिवा व दलित साहित्यकृतीतील अनन्यसाधारणता या दोहोंच्या शोधाबोधासाठी समग्र मराठी साहित्य परंपरेतील आजवरच्या फलितांचा आधार घेणे रास्त ठरेल.’

वरीलप्रमाणे दलित साहित्यातील सामाजिक जाणिवेला, डॉ.गंगाधर पानतावणे ‘दलित जाणीव’ म्हणतात. ‘दलित’ असण्यापेक्षा ‘दलित जाणीव’ साहित्यातून व्यक्त होणे त्यांना महत्त्वाचे वाटते. दलित जाणिवेविषयी डॉ.पानतावणे लिहितात, ‘दलित हा परिवर्तनाचा व क्रांतीचा वाहक असल्यामुळे त्याने ‘दलित साहित्य’ ही संज्ञा अर्थपूर्ण व भूषणभूत मानली आहे. दलित या शब्दाने आता आत्मतेजाचे पंख पसरले आहेत म्हणून ‘दलित’ या शब्दाची आम्हाला लाज वाटत नाही. ज्यांना दलित म्हणवून घेण्याची व दलित साहित्याशी नाते सांगण्याची लाज वाटते ते स्वप्नांशी खेळतात व स्वप्नरंजनात दंग होतात. ‘जन्मदलित’ असूनही त्यांचे साहित्य दलित नसते. स्वप्नाळू जगाची कविता लिहिणाऱ्या दलित कवींची

रचना स्वप्नरंजन करणारी असेल, स्वत्व हरपलेली असेल. म्हणून येथे प्रश्न उद्‌भवतो तो जाणिवांचा. दलित असणे व दलित जाणीव साहित्यातून व्यक्त करणे या दोन बाबी भिन्न आहेत.'

प्रा.गो.म.कुलकर्णी यांनी 'दलित साहित्यः प्रवाह आणि प्रतिक्रिया' या ग्रंथात डॉ.गंगाधर पानतावणे यांची मुलाखत समाविष्ट केली आहे. 'दलित जाणीव' म्हणजे काय ? या प्रश्नांच्या उत्तरात डॉ.पानतावणे म्हणतात, 'जीवनानुभव हीच जाणीव असते, म्हणून दलित अनुभव हीच 'दलित जाणीव' होय. दलित जाणीव ही इतर जाणिवांपेक्षा वेगळी आहे. हे वेगळेपण संस्कृती, इतिहास आणि वर्तमान ह्या संदर्भात स्पष्ट होते. दलित लेखक हा भारतीय संस्कृतीच्या अंतर्गत असणाऱ्या शोषित व पीडित अशा उपसंस्कृतीचा घटक आहे. त्यामुळे त्याची जाणीव त्या संबंधानुरोधाने निर्माण झाली आहे.

भारतामध्ये आर्थिक शोषितांची संख्या मोठी आहे. परंतु आर्थिक व सामाजिक शोषण एकाच वेळी ज्यांचे झाले व होते, अशांची संख्या त्याहीपेक्षा मोठी आहे; दलितांचे शोषण आर्थिक व सामाजिक असे अभिन्न आहे. मानसिक दास्य हा तर त्याचा कणाच आहे. त्यामुळे त्यांचे मनुष्यत्वच नाकारले गेले होते. आणि त्याला आधार राहिला, धर्मविचारांचा, धर्मशास्त्रांचा, ही कृत्रिमरीत्या निर्माण केली गेलेली दास्यता दलित जाणिवेशी निगडित आहे. दलित जाणीव, आपले अस्तित्व नाकारले गेलेल्या प्रतीतीतून जन्म घेते. त्यामुळे इतिहास आणि वर्तमानाशी ती सतत आपले नाते काय अशी पृच्छा करीत असते. आणि त्याबरोबरच आपले संबंध भिन्न आहेत, वेगळे आहेत, अशी धारणाही प्रगट करीत असते. आणि म्हणून भिन्न भिन्न काही समाजस्थिती व भौतिक स्थिती बदलत असली तरी शोषक व पीडकांच्या जाणिवा कुठे ना कुठे मूळ धरुन असतात. बदलत नाहीत. हे वास्तव लक्षात घेतले की, दलित जाणिवांचे अटळपणही लक्षात घ्यावे लागते.

दलित जाणीव शोषणाच्या सर्वच संस्था नाकारते. त्यामुळे तिचे नाते वैश्विक

जाणिवेशी आहे. बाह्य जीवन आणि मानसिक आवर्तबध्दता ह्यातील विसंवादाचा अर्थ शोधणारी दलित जाणीव समाज व संस्कृतीच्या पातळीवर मानवी अनुभवच प्रगट करीत असते.

आणखी एक महत्त्वाचे म्हणजे, दलित अनुभव हा व्यक्तिगत असला तरी तो व्यक्तिनिष्ठ नाही, कारण तो समूहमन व्यक्त करीत असतो. म्हणून असे म्हणता येईल की, दलित जाणीव ही समूहनिष्ठ आहे.

दलित जाणीव काहीमूल्ये नाकारते व काही स्वीकारते हेही एक विशेष. माणसामाणसातील विसंवाद व वैर, अस्पृश्यता, पोथीनिष्ठा, अंधश्रध्दा, प्राक्तनवाद, वर्णवाद, मानवी दास्य, पवित्र, अपवित्रतेच्या भ्रामक कल्पना ज्यावेळी दलित जाणीव नाकारते, त्याचवेळी मानवी प्रतिष्ठा व स्वातंत्र्य, मानवी जीवनातील अर्थपूर्णता आणि समानता (सदृशता नव्हे) स्वीकारते असा त्याचा अर्थ आहे. विद्रोह हा ह्या जाणिवेचा प्रकट आविष्कार होय. विद्रोह तर परिवर्तनाचा वाहक आहे. म्हणून विद्रोह ही जाणीव वर्तमान आहे. ती बंदिस्त किंवा विध्वंसक नाही; म्हणूनच ती रचनात्मक आहे.

दलित जाणीव ही 'मनुष्यत्वा' ची जाणीव असल्यामुळे ती व्यक्त करणारे साहित्य जगातील माणुसकीच्या अनुभूतीतून मानवी स्थिती निर्देशित करणाऱ्या साहित्याशी आपले नाते जोडते ह्यात शंका नाही.'

वरीलप्रामणे डॉ.गंगाधार पानतावणे यांनी 'दलित जाणिवेची' सूक्ष्मपणे व्यापक चर्चा केली आहे.

इ.स.२००० नंतरच्या दलित कवितेत जागतिकीकरणाच्या तडाख्याने आमुलाग्र बदल झाला. दलित कवितेतील अनुभवविश्वाने स्वतःची कूस बदलली. या दलित कवितेत 'नवीन दलित जाणीव' आकारण्यात आली. जाणीव म्हणजे केवळ बौध्दिक दृष्टिकोन नव्हे. जाणिवतेचा संबंध सामाजिक जीवनात घडणाऱ्या मूलभूत परिवर्तनाच्या प्रक्रियेशी आहे. जाणीव ही मूल्यगर्भ व मूल्याधिष्ठित असते.

इ.स.२००० नंतरच्या दलित कवितेतील बदललेल्या मूल्यगर्भ व मूल्याधिष्ठित 'दलित जाणीव' ही बहुतांश दलित कवींच्या कवितेतून व्यक्त होतांना दिसते. त्यामध्ये प्रामुख्याने अरुण काळे, प्रज्ञा दया पवार, महेंद्र भवरे, उत्तम अंभोरे, राजेंद्र गोणारकर, उध्दव नारनवरे, शेषराव पिराजी धांडे, केतन पिंपळपुरे, आदिनाथ इंगोले, युवराज सोनटक्के, लहु कानडे, महेंद्र गायकवाड, संध्या रंगारी या कविंच्या कवितांमध्ये ही नवी दलित आढळते. म्हणूनच मी इ.स.२००० नंतर दलित कवितेतील बदलत्या दलित जाणिवांचा अभ्यास' हा विषय संशोधनासाठी निश्चित केला.

२. संशोधन विषयाचे शीर्षक :

'इ.स.२००० नंतरच्या दलित कवितेतील बदलत्या दलित जाणिवांचा अभ्यास'

३. संशोधनाची उद्दिष्टे :

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे असतील.

१. दलित कवितेच्या पार्श्वभूमीचा स्थुलमानाने अभ्यास करणे.

२. दलित कवितेचे स्वरुप व गुणवैशिष्ट्ये स्पष्ट करणे.

३. 'दलित जाणीव' ही संकल्पना स्पष्ट करणे.

४. इ.स.२००० पूर्वीच्या दलित कवितेतील दलित जाणिवांचा शोध घेणे.

५. इ.स.२००० नंतरच्या दलित कवितेतील बदलत्या दलित जाणिवांचा अभ्यास करणे.

४. गृहीतके :

'जेव्हा ऐतिहासिक संशोधन हे गुणात्मक पध्दतीने केले जाते, तेव्हा गृहीतकांची आवश्यकता नसते.' (पंडित बन्सी बिहारी, संशोधन पध्दती १९९७ पृ.१०७). उपरोक्त अवतरणावरुन हे स्पष्ट होते की, प्रस्तुत संशोधन हे ऐतिहासिक, गुणात्मक, समीक्षात्मक पध्दतीने करावयाचे असल्याने व अभ्यासाचा विषय हा भूतकाळाशी निगडीत असल्याने गृहीतकांची मांडणी करणे संयुक्तित ठरत नाही.

५. व्याप्ती :

प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती मी पुढीलप्रमाणे निश्चित केली आहे.

प्रस्तुत संशोधनात इ.स.२००० नंतरच्या दलित कवितेतील बदलत्या दलित जाणिवांचा साकल्याने अभ्यास करावयाचा अभ्यास आहे. 'दलित कविता' व 'दलित कवितेतील दलित जाणिवा' ही प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती असेल.

६. मर्यादा :

प्रस्तुत संशोधनाची मर्यादा मी पुढीलप्रमाणे स्पष्ट केली.

प्रस्तुत संशोधनाचे निष्कर्ष हे उपलब्ध झालेल्या संकलित माहितीपुरतेच मर्यादित असतील. हे संशोधन दलित कवितेपुरतेच सिमित असून प्रस्तुत संशोधन हे इ.स.२००० नंतरच्या एकूण दलित कवींपैकी अरुण काळे, प्रज्ञा दया पवार, महेंद्र भवरे, उत्तर अंभोरे, राजेंद्र गोणारकर, उध्दव नारनवरे, शेषराव पिराजी धांडे, केतन पिंपळपुरे, आदिनाथ इंगाले, युवराज सोनटक्के, लहू कानडे, महेंद्र गायकवाड, संध्या रंगारी या कवींच्या कवितांपुरेतच मर्यादित असेल.

७. संशोधन पध्दती :

संशोधनाची फलनिष्पती ही संशोधनाच्या कार्यपध्दतीवर अवलंबून असते. प्रस्तुत संशोधन हे उद्दिष्टानुसार व्हावे, संशोधन योग्य दिशेने व्हावे, यासाठी पुढील संशोधन पध्दतीचा मी अवलंब केला आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी मी ऐतिहासिक संशोधन पध्दती, ग्रंथालय संशोधन पध्दतीचा अवलंब केला आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी 'दलित कविता' आणि 'बदलत्या दलित जाणिवा' यासंबंधी उपलब्ध झालेल्या प्रदताच्या आधारे विश्लेषण करण्यासाठी मी गुणात्मक पध्दतीचा अवलंब केला आहे.

८. संशोधनाचे महत्त्व :

'इ.स.२००० नंतरच्या दलित कवितेतील बदलत्या दलित जाणिवांचा अभ्यास' या विषयावरील संशोधनामुळे साहित्य विश्वात नवीन भर पडेल. प्रस्तुत संशोधनामुळे वाङ्मयीन, समीक्षात्मक विचारांचे समृध्दीकरण होईल. प्रस्तुत संशोधनाचे दलित साहित्य, समाज व समीक्षाशास्त्र या क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान ठरेल.

९. संशोधन आराखड्याचे प्रारुप

प्रकरण पहिले : मराठी दलित कवितेची पार्श्वभूमी

प्रस्तुत प्रकरणात मराठी दलित कवितेची पार्श्वभूमी व वाटचाल याचा स्थूलमानाने अभ्यास केला जाईल. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे युगप्रवर्तक विचार व कार्य ही दलित कवितेची प्रेरणा आहे. याचाही स्थूलमानाने अभ्यास करण्यात येईल. तसेच नामदेव ढसाळ व अन्य प्रारंभीच्या कवींचा स्थूलमानाने या प्रकरणात अभ्यास करावयाचा आहे.

प्रकरण दुसरे : इ.स.२००० पूर्वीच्या मराठी दलित कवितेचे स्वरुप व वैशिष्ट्ये

प्रस्तुत प्रकरणात दलित कवितेचे वेगळेपण स्पष्ट करणारी, दलित कवितेची स्वरुप वैशिष्ट्ये विशद करण्यात येतील.

प्रकरण तिसरे : इ.स.२००० नंतरच्या मराठी दलित कवितेची स्वरुप व वैशिष्ट्ये

प्रस्तुत प्रकरणातून इ.स.२००० नंतरच्या मराठी दलित कवितेचे स्वरुप व गुणवैशिष्ट्ये विशद करण्यात येतील.

प्रकरण चौथे : इ.स.२००० नंतरच्या दलित कवितेतील बदलत्या दलित जाणीवाः

प्रस्तुत प्रकरणातून इ.स.२००० नंतरच्या, नव्या २१ व्या शतकातील आरंभीच्या दलित कवितेतील बदलत्या दलित जाणिवांचा अभ्यास निवडक कवींच्या आधारे करावयाचा आहे. या निवडक कवींमध्ये अरुण काळे (नंतर आलेले लोक (२००६), 'ग्लोबलचं गावकुस' (२००८), प्रज्ञा दया पवार (उत्कट जीवघेण्या धगीवर (२००२), 'मी भिडवू

पाहतेच समाग्राशी डोळा' (२००७)), महेंद्र भवरे ('महासत्तेचे पीडादान' (२००५)), उत्तम अंभोरे ('धगीवरची अक्षरं (२००७)), 'गनीम' (२०२२)), राजेंद्र गोणारकर (अनारंभ (२००१)), उध्दव नारनवरे ('हुंकार उठले गर्जत' (२००५)), 'हुंकार बनले हुंदके' (२०२२)), शेषेराव पिराजी धांडे (रस्ता सोडून चालला कुठे' (२००९), 'आमचा आलेख कोराच' (२०१६), (बिघडलेले होकायंत्र (२०२२)), केतन पिंपळपुरे ('मार्शल रेस' (२००२), 'डेमोफून' (२००६)), आदिनाथ इंगोले (पाखंड (२००३)), युवराज सोनटक्के ('अग्निशाळा (२००१)), लहू कानडे (टाचाटिभा'), महेंद्र गायकवाड ('ओलीस ठेवलेली माणसे' (२००२), 'जगणे असह्य झाले' (२०१०), 'अस्तित्व गमावलेली माणसे' (२०२२), संध्या रंगारी 'कवडसे' (२००३), 'संध्यारंग (२०१०), या कवींच्या काव्यसंग्रहाचा अभ्यास अभिप्रेत आहे.

प्रकरण पाचवे : उपसंहार व निष्कर्ष :

या प्रकरणात प्रस्तुत विषयाचा अभ्यास केल्यानंतर काही निष्कर्ष हाती आलेले आहेत. या प्रकरणातून प्राप्त झालेले काही निष्कर्ष मांडण्यात येतील.

संदर्भ सूची :

१. रा.ग.जाधव, ‘निळी पहाट’ श्रीविद्या प्रकाशन, पुणे - १९७९.

२. रा.ग.जाधच, ‘निळी क्षितिजे’, अमेय प्रकाशन, नागपूर - १९८२.

३. डॉ.गंगाधर पानतावणे यांची भाषणे आणि मुलाखती, ‘साहित्य : शोध आणि संवाद’ (संपा. मनोहर जाधव), सुविधा प्रकाशन, पुणे - २००५.

४. केशव मेश्राम, ‘विद्रोही कविता’ कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे - १९८७.

५. महेंद्र भवरे, ‘दलित कवितेचे अर्धशतक - मराठी दलित कवितेचा इतिहास’ म.रा.साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई-२०१८.

६. भालचंद्र फडके, ‘दलित साहित्य : वेदन्त आणि विद्रोह’ श्रीविद्या प्रकाशन, पुणे -१९७७.

७. महेंद्र भवरे ‘दलित कविता आणि प्रतिमा’ लोकवाङ्मय गृह, मुंबई-२०१२.

८. गंगाधर पानतावणे, ‘आंबेडकरी जाणिवांची आत्मप्रत्ययी कविता, गोदा प्रकाशन, औरंगाबाद-२०१०.

संशोधक	मार्गदर्शक
फारुकी मुशीर अहेमद आबेद अहेमद	**प्रा.डॉ.भास्कर श्रावण गायकवाड**